सब ज्वानी निकल जावे । पीछे गधडा मटी खावे ॥ गांवढाळ सो क्या लेवें ॥ हगवनी भरी नहीं धोवे ॥ ५ ॥ मेरी दारु जिन्हें खाया । दिदार दरगां सो हि पाया ॥ तल्हे मुंढी घाल जीवें । बिगारी सोवे क्या लेवे ॥ ६ ॥ बजार-का बुझे भाव । वो हि पुसता आवे ठाव ॥ फुकट बाटु कहे तुका । लेवे सोहि लें हिसखा ॥ ७ ॥

## गोंधळ. अभंग.

॥ ६९५१ ॥ राजस सुंदर बाळा । पाहों आलिया सकळा वो ॥ बिंबीं बिंबोनि ठेली । माझी परब्रह्म वेल्हाळा वो ॥ कोटि रविशशि माझी । पर-ब्रह्म वेल्हाळा वो ॥ १ ॥ राजस विठाबाई । माझें ध्यान तुझे पायीं वो ॥ सजुनियां चौघींसी । लावी आपुलिये सोई वो ॥ २ ॥ सकुमार साजिरीं । कैसीं पाउलें गोजिरीं वो ॥ कंठीं तुळसी माळा । उभी भीवरेच्या तिरीं वो ॥ दंत हिरया ज्योति । शंखचक्र मिरवे करीं वो ॥ ३ ॥ निर्गुण निराकार ॥ वेदां न कळेचि आकार वो ॥ शेषादिक श्रमले । श्रुती न कळे तुझा पार वो ॥ उभारोनी बाहे । भक्तां देत अभयकर वो ॥ ४ ॥ येऊनी पंढरपुरा । अवतरली सारंगधरा वो ॥ देखोनी भक्ति भाव । वोरसली अमृतधारा वो ॥ देऊनी प्रेम पान्हा । तुकया स्वामीनें किंकरा वो ॥ ५ ॥

॥ ६९५२ ॥ सुदिन सुवेळ । तुझा मांडिला गोंधळ वो ॥ पंच प्राण दि-वटे । दोनी नेत्रांचे हिलाल वो ॥ १ ॥ पंढरपुरनिवासे । तुझे रंगीं नाचत असें वो ॥ नवस पुरवीं माझा । मनींची जाणोनियां इच्छा वो ॥ २ ॥ मांडि-ला देव्हारा । तुझा त्रिभुवनामाझारी वो ॥ चौक साधियेला । नाभिकळस ठेविला वरीवो ॥ ३ ॥ बैसली देवता । पुढें वैष्णवाचें गाणें वो ॥ उद्गारें गर्जती । कंठीं तुळसीचीं भूषणें वो ॥ ४ ॥ स्वानंदाचे ताटीं । धूप दीप पंचारती वो ॥ ओवाळिली माता । विठाबाई पंचभूतीं वो ॥ ५ ॥ तुझें तुज पावलें । माझा नवस पुरवीं आतां वो ॥ तुका ह्मणे राखें । आपुलिया शरणागता वो ॥ ६ ॥

॥ ६९५३ ॥ शंख करिशी ज्याच्या नांवें । सार्चे तुज नाहीं ठावें ॥ ऐक सांगतों एका भावें । सांपडे घरीं तें जीवऊनि खावें ॥ रे विठ्ठल ॥ १ ॥ टिळे माळा करंडी सोंग । धरूनी चाळविलें जग ॥ पसरी हात नाहीं

त्याग । दावी दगड पूजी भग ॥ रे विठ्ठल ॥ २ ॥ राख लावुनी अंग मळी । वाये ठोके मी एक बळी ॥ वासने हातीं बांधवी नळी । सासी येऊनी गिळी ॥ रे विठ्ठल ॥ ३ ॥ कोण तें राहडीचें सुख । वरते पाय हारतें मुख ॥ करवी पीडा भोगवी दुःख । पडे नरकीं परि न पळे मूर्ख ॥ रे विठ्ठल ॥ ४ ॥ सिकला फाक मारी हाका । रांडापोरें मेळवि लोकां ॥ विटंबी शरीर मागे रुका । केलें तें गेलें अवघेंचि फुका ॥ रे विठ्ठल ॥ ५ ॥ कळावें जनां मी एक बळी । उभा राहुनी मांडी फळी । फोडोनी गुडघे कोंपर चोळी । आपला घात करोनी आपणाचि तळमळे । रे विठ्ठल ॥ ६ ॥ फुकट खेळें ठकलीं वांयां । धरूनी सोंग बोडक्या डोया ॥ शिवों नये ती अंतरीं माया । संपादणीविण विटंबिली काया ॥ रे विठ्ठल ॥ ७ ॥ धुळी माती कांहीं खेळों च नका । जवादी चंदन घ्यावा बुका ॥ आपणा परिमळ आणिकां लोकां । मोलाचि महिमा फजिती फुका ॥ रे विठ्ठल ॥ ८ ॥ बहुत दुःखी झालियां खेळें । अंगीं बुद्धि नाहींत बळें ॥ पाठीवरी तोबा तोंड काळें । रसना द्रवे उपस्थाच्या मुळें ॥ रे विठ्ठल ॥ ९ ॥ काय सांगतो तें ऐका तुका । मोडा खेळ कांहीं अवगों च नका ॥ चला जेवूं आधीं पोटीं लागल्या भुका । घाल्यावरी बरा टाकमटिका ॥ रे विठ्ठल ॥ १० ॥

॥ ६९५४ ॥ ऐक बाई तुज वो कांहीं सांगतें शकुन । निजालिया भुर होसी जागें ह्मणऊन ॥ १ ॥ मान्य माझें केलें सांगतें एका बोलें । न घेतां हे भलें कळों कोणा लोकांसी ॥ २ ॥ सांगतें गुण जीवींची खूण ऐक माझी मात । बैस एका भावें माझे हातीं दे वो हात ॥ ३ ॥ बरवा घरचार तुज सांपडला ठाव । फळ नाहीं पोटीं येथें दिसे खोटा भाव ॥ ४ ॥ आहे तुझे हातीं एका नवसाचें फळ । भाव करी साह्य चहुं अठरांच्या बळें ॥ ५ ॥ करीं लागपाठ चित्त वित्त नको पाहों । अखई तो चुडा तुज भोगईल ना हो ॥ ६ ॥ कुळींची हे मुळी तुझे लागलीसे देवी । पडिला विसर नेदी फळ नाहीं ठावी ॥ ७ ॥ तुका ह्मणे नांद सुखें धरीं आठवण । माझ्या येती कोणी सांचा राख बरा मान ॥ ८ ॥

## कावडे. अंभग.

॥ ६९९५ ॥ आहा रे भाई । प्रथम नमूं तो विनायक ॥ ठेवूनी गुरुचरणीं मस्तक । वदेल प्रसादिक वाणी ॥ हरिहरांचे पवाडे ॥ १ ॥ माझी ऐसी ब्रीदावळी । दासें दासत्वें आगळी ॥ पान्हेरीनें मार्ग मळी । जीवन घ्या रे कापडि हो ॥ २ ॥ जें या सीतळाहूनी सीतळ । पातळाहूनी जें पातळ ॥ प्रेमामृत रसाळ । तें हें सेवा अहो भाग्याचे ॥ ३ ॥ जिंकाल तरी जिंका रे अभिमान । दवडाल तरी दवडा लज्जा आणि मान ॥ धराल ते धरा शंभूचे चरण । दावाल पण ऐसा दावा तो ॥ ४ ॥ काळा घेऊं नेदीं वाव । आला तो राखें घावडाव ॥ शुद्ध सत्वीं राखोनी भाव । ह्मणा महादेव हरिहर वाणी गर्जों द्या ॥ ५ ॥ पराविया नारी माउली समान । परधनीं बाटों नेदीं मन ॥ जीवित्व तें तृणासमान । स्वामिकाजीं जाण शूर ह्मणों तया ॥ ६ ॥ शक्ति वेचाविया परउपकारा । खोटें खोट्याचा पसारा ॥ सत्य तें भवनदीचा तारा । आळस तो न करा येथें अहो सांगतों ॥ ७ ॥ व्रत करा एकादशी सोमवार । कथा पूजन हरिजागर ॥ पुण्य तें असे गातां नाचतां बहु फार । पुन्हा बोलिला-संसार नाहीं नाहीं सत्यत्वें ॥ ८ ॥ संग संतांचा करितां बरवा । उत्तमोत्तम कीर्तीचा ठेवा ॥ पंथ तो सुपंथें चालावा । उगवा वासना लिगाड ॥ ९ ॥ तुका चालवितो कावडी । प्रवृत्ति निवृत्ति चाखेडी । पुढती पुढतां अधिक गोडी । भरूनि कळस भजन आवडी केशवदास नटतसे ॥ १० ॥

॥ ६९९६ ॥ आहा आहा रे भाई । हें अन्नदानाचें सत्र ॥ पव्हे घातली सर्वत्र ॥ पंथीं अवघे पंथ मात्र । इच्छाभोजनाचें आर्त पुरवावया ॥ १ ॥ यावें तेणें घ्यावें । न सरेसें केलें सदाशिवें ॥ पात्र शुद्ध पाहिजे बरवें । मंगळभावें सकळ हरि ह्मणा रे ॥ २ ॥ नव्हे हें कांहीं मोकळें । साक्षी चौघांच्चिया वेगळें ॥ नेदी नाचों मताचिया बळें । अणु अणोरणीया आगळें । महदि महदा साक्षित्वें हरि ह्मणा रे ॥३॥ हे हरिनामाची आंविली । जगा पोटभरी केली ॥ विश्रांति कल्पतरुची साउली । सकळां वर्णां सेवितां भली । ह्मणा हर हर महादेव ॥ ४ ॥ तुका हरिदास तराळ । अवघे हाकारी सकळ ॥ या रे वंदूं शिखरातळ । चैत्रमास पर्वकाळ महादेवदर्शनें ॥ ५ ॥

॥ ६९९७ ॥ आहा रे भाई । नमो उदासीन झाले देहभावा । आळविती देवा तया नमो ॥ १ ॥ नमो तीर्थपंथें चालती तयांसी । येती त्यांसी बोळविती त्यां नमो ॥ २ ॥ नमो तयां संतवचनीं विश्वास । नमो भावें दास्य गुरुचें त्यां ॥ ३ ॥ नमो तया मातापितांचें पाळण । नमो त्या वचन सत्य वदे ॥ ४ ॥ नमो तया जाणे आणिकाचें सुखदुःख । राखे तान भुक तया नमो ॥ ५ ॥ परोपकारी नमो पुण्यवंता । नमो त्या दमित्या इंद्रियांसी ॥ ६ ॥ तुका ह्मणे नमो हरीचिया दासा । तेथें सर्व इच्छा पुरलीसे ॥ ७ ॥

॥ ६९९८ ॥ आहारे भाई । तयावरी माझी ब्रीदावळी । भ्रष्ट ये कळी क्रियाहीन ॥ १ ॥ थुंका थुंका रे त्याच्या तोंडावरी । वाणिली ते थोरी दवडा वांयां बाहेरी ॥२॥ बाइलेचा दास पित्रांस उदास । भीक भिकाऱ्यास नये दारा ॥ ३ ॥ विद्याबळें वाद करूनियां छळी । आणिकासी फळी मांडोनियां ॥ ४ ॥ गांवींचिया देवा नाहीं दंडवत । ब्राह्मण अतीत घडेचिना ॥ ५ ॥ सदा सर्वकाळ करितोचि निंदा । स्वप्नीं ही गोविंदा आठवेना ॥ ६ ॥ खासेमध्यें धन पोटासी बंधन । नेणें ऐसा दानधर्म कांहीं ॥ ७ ॥ तुका ह्मणे नटे दावूनियां सोंग । लवों नेदी अंग भक्तिभावें ॥ ८ ॥

॥ ६९९९ ॥ आहा रे भाई । गंगा नव्हे जळ । वृक्ष नव्हे वड पिंपळ ॥ तुळसी रुद्राक्ष नव्हे माळ । श्रेष्ठतनु देवाचिया ॥ १ ॥ समुद्र नदी नव्हे पैं गा । पाषाण ह्मणों नये लिंगा ॥ संत नव्हती जगा । मानसा त्या सारिखे ॥ २ ॥ काठी म्हणों नये वेतु । अन्न ह्मणों नये सांतु । राम राम हे मातु । नये म्हणों शब्द हे ॥ ३ ॥ चंद्र सूर्य नव्हती तारांगणें । मेरु तो नव्हे पर्वतासमान ॥ शेष वासुकी नव्हे सर्प जाण । विखाराच्या सारिखे ॥ ४ ॥ गरुड नव्हे पाखरूं । ढोर नव्हे नंदिकेश्वरु ॥ झाड नव्हे कल्पतरु । कामधेनु गाय न ह्मणावी ॥ ५ ॥ कूर्म नव्हे कासव । डुकर नव्हे वराह ॥ ब्रह्मा नव्हे जीव । स्त्री नव्हे लक्ष्मी ॥ ६ ॥ गवाक्ष नव्हे हाड । पाटाव नव्हे कापड ॥ परीस नव्हे दगड । सगुण ते ईश्वराचे ॥ ७ ॥ सोनें नव्हे धातु । मीठ नव्हे रेतु ॥ नाहीं नाहीं चर्मांतु । कृष्णाजिन व्याघ्रांबर ॥ ८ ॥ मुक्ताफळें नव्हेती गारा । खड्याऐसा नव्हे हिरा ॥ जीव नव्हे सोइरा । बोळवीजे स्वइच्छेनें ॥ ९ ॥ गांव नव्हे द्वारावती । रणछोड नव्हे मूर्ति ॥ तीर्थ नव्हे गोमती । मोक्ष घडे दर्शनें ॥ १० ॥ कृष्ण नव्हे भोगी । शंकर नव्हे जोगी ॥ तुका पांडुरंगीं । हा प्रसाद लाधला ॥ ११ ॥

॥ ६९६० ॥ आहा आहारे भाई। तयासी कल्याण चिंतीतों आशिर्वचन॥ ऐका गा ए जनसंत तुह्मी ॥ १ ॥ आलिया अतीता पांथिक देव यात्रा । देती भूतीं सर्वत्रा अन्नपान ॥ २ ॥ चैत्र मासीं येतां प्रेमाची अंबिली। आवडी कृष्णावळी दान दे त्या ॥ ३ ॥ वस्त्र दान अश्व वृषभ आवडी-नें। काया कष्टवून चित्तवित्तें ॥ ४ ॥ तुका ह्मणे करी हरिहरस्मरण । घोष हा गर्जोन हरीहर ॥ ५ ॥

## सौऱ्या. अभंग.

॥ ६९६१ ॥ वेसन गेलें निष्काम झालें नर नव्हे नारी। आपल्या तुटी पारख्या भेटी सौरियांचे फेरी ॥ १ ॥ त्याचा वेध लागला छंद हरि गोविंद वेळोवेळां। आपुलें मागें हांसत रागें सांवळें घालिती गळां ॥ २ ॥ जन वेषा भीतें तोंडा आमुच्या भांडपणा। कर कटीं भीमा तटीं पंढरीचा राणा ॥ ३ ॥ वेगळ्या याति पडिलों खंतीं अवघ्या एका भावें। टाकियेली चाड देहभाव जीवें शिवें ॥ ४ ॥ सकळांमधीं आगळी बुद्धि तिची करूं सेवा। वाय तुंबा-मूढासवें भक्ती नाचों भावा ॥ ५ ॥ ह्मणे तुका टाक रुका नाचों निर्लज्जा। बहु झालें सुख काम चुकलों या काजा ॥ ६ ॥

॥ ६९६२ ॥ आणिकां उपदेशूं नेणें नाचों आपण। मुंढा वांयां मारगेली वांयां हासे जन ॥ १ ॥ तैसा नव्हे चाळा आवरीं मन डोळा॥ पुढिलांच्या कळा कवतुक जाणोनी ॥ २ ॥ बाहिरल्या वेषें आंत जसें तसें। झाकलें तों बरें पोट भरे तेणें मिसें ॥ ३ ॥ तुका ह्मणे केला तरी करीं शुद्ध भाव। नाहीं तरी जासी वांयां हा ना तोसा ठाव ॥ ४ ॥

॥ ६९६३ ॥ टाक रुका चाल रांडे कां गे केली गोवी । पुसोनियां आले ठाव ह्मणोनी देतें सिवी ॥ १ ॥ आतां येणें छंदें नाचों विनोदें। नाहीं या गोविंदें माझें मजसी केलें ॥ २ ॥ कोरडे ते बोल कांगे वेचितेशी वांयां। वर्ते करूनी दावीं तुझ्या मुळींचिया ठाया ॥ ३ ॥ याजसाठीं ऱ्या डौर ध-रियेला हातीं। तुका ह्मणे तुह्मां गांठी सोडायाची खंती ॥ ४ ॥

॥ ६९६४ ॥ मोकळी गुंते रिती कुंथे नाहीं भार दावें। धेडवाडा बै-सली खोडा घेतली आपुल्या भावें ॥ १ ॥ ऐका बाई लाज नाहीं आणिकां

त्या गरतीची । समाधानीं उंच स्थानीं जाणे सेवा पतीची ॥ २ ॥ न बोलतां करी चिंता न मारितां पळे । दादला सेज नावडे निज जगझोडीचे चाळे ॥ ३ ॥ देखत आंध बहिर कानीं बोल बोलतां मुकें । तुका ह्मणे पतन सोयरीं ऐसीं झालीं एकें ॥ ४ ॥

॥ ६९६५ ॥ धन्य झाली भेटी । नाचूं वाळवंटी ॥ १ ॥ सौरी झालें भलें केलें मज पांडुरंगें । संसार घोर सांडुन दूर नेलें आपुले संगें ॥ २ ॥ एकाएकीं महा सुखीं निजलें एका सेजे । अवघा सखा दावी लोका नाहीं तुझें माझें ॥ ३ ॥ तुका ह्मणे नलगे येणें पुन्हा या संसारा । तीळांजुळी देऊनियां नामीं केला थारा ॥ ४ ॥

॥ ६९६६ ॥ चाल सख्या रामा आतां सुख होईल तुह्मां ॥ १ ॥ जातीभ्रष्ट झाली सौरी हिंडे दारोदारीं । सावल उचलुन जगासि दावी डौर घेऊन वाजवित करीं ॥ चाल० ॥ १ ॥ शेंवडा व्याही चिपडी विहीण दोघां प्रीत मोठी ॥ विहीण लाजून हळुच पाहे व्याही नाक चाटी ॥ चाल० ॥२॥ बाईल बाहेर ख्याली दादला तिचा भोळा । परपुरुष पाहोनियां खुणावित डोळां ॥ चाल० ॥ ३ ॥ ऐशी सौरी गमजा करी डौर छंदें नाचे । तुकारामा ध्यान पायीं अखंड नाम वाचे ॥ चाल० ॥ ४ ॥

॥ ६९६७ ॥ उंच नारी दीर्घ भारी दादले ठेंगणे पोरी । एकाएकीं हाता नये सोवलें केलें वरी ॥ १ ॥ चाल धण्या भावा लिंग नासलें देवा ॥ २ ॥ उंच माडी सावर ताडी पलंग घालगे झोडी । सारी रात घसके घेतां झाली तडातोडी ॥ ३ ॥ भावखेडा भक्तिचुडा डौर नाहीं जोडा । थाक तोडी डोळे मोडी दाढीचा केला बोडा ॥ ४ ॥ मन फुका घेती फुका जनाचा घेती थुंका । इतुकें जरी हाता ये तरी होय चैतन्य तुका ॥ ५ ॥

॥ ६९६८ ॥ सातें चला काजळ घाला तेल फणी करा । दिवाणदारीं बैसले पारीं नाचों फेर धरा ॥ १ ॥ या साहेबाचें झालें देणें वेळोवेळां न लगे येणें । आतां हाटीं काशासाठीं हिंडों पाटी दुकानें ॥ २ ॥ अवघ्या जणी मुंढा धणी नाचों एकें घाई । सरसावलें सुख कैसा चाळा एके ठायीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे वोळगों एका तोड चिंता माया। देऊं उद्गार आतां जाऊं मुळींचिया ठाया ॥ ४ ॥

॥ ६९६९ ॥ सौरी सुर झालें दूर डौर घेतला हातीं । माया मोह सांडवलें तीही लोकीं झालें सरती ॥ १ ॥ चाल विठाबाई अवघी पांज देई । न

घरीं गज कांहीं वाळवंटीं सांपडतां ॥ २ ॥ हिंडोनी चौऱ्याशी घरें आलें तुझ्या दारा । एक्या रुक्यासाठीं आंचवलें संसारा ॥ ३ ॥ लाज मेली शंका गेली नाचों महाद्वारीं । भ्रांति सांवलें फिटोनि गेलें आतां कैंची उरी ॥ ४ ॥ झालें भांडी जगा सांडी नाहीं भीड चाड । घालीन चरणीं मिठी पुरवीन जीवींचें तें कोड ॥ ५ ॥ तुका ह्मणे रुका करी संसारतुटी । आतां तुह्मां आह्मां कैसी झाली जीवें साटी ॥ ६ ॥

॥ ६९७० ॥ सम सपाट बेसनकाट निःसंग झालें सौरी । कुडपीयेला देश आतां येऊं नेदीं दुसरी ॥ १ ॥ गाऊं रघुरामा हेंचि उरलें आह्मां । नाहीं जीवतमा वित्तगोतासहित ॥ २ ॥ ठाव झाला रिता झांकूनि काय आतां । कोणासवें लाज कोण दुजा पाहता ॥ ३ ॥ सौरियांचा संग आह्मां दुरावलें जग । भिन्न झालें सुख भाव पालटला रंग ॥ ४ ॥ लाज भय ह्मणी नाहीं तजियेलीं दोन्ही । फिरविला वेष नव्हों कोणाचींच कोणी ॥ ५ ॥ तुका ह्मणे हा आह्मां वेष दिला जेणें । जना अचित सर्वे असों एकपणें ॥ ६ ॥

॥ ६९७१ ॥ नव्हे नरनारी संवसारीं अंतरलों । निर्लज्ज निष्काम जना वेगळेचि ठेलों ॥ १ ॥ चाल रघुरामा ने आपुल्या गांवा । तुजविण आह्मां कोण सोयरा सांगाती ॥ २ ॥ जनवाद लोकनिंद्य पिशुनाचे चेरे । साहूं तुजसाठीं अंतरलीं सहोदरें ॥ ३ ॥ बहुतां पाठीं निरोप हातीं पाठविला तुज । तुका ह्मणे आतां सांडुनि लौकिक लाज ॥ ४ ॥

॥ ६९७२ ॥ नीट पाट करूनी थाट । दावीतसे तोरा ॥ आपणाकडे पाहो कोणी । निघाली बाजारा ॥ १ ॥ ते सौरी नव्हे निकी । भक्तीविण फिकी ॥ २ ॥ चांग भांग करूनी सोंग । दावी माळा मुद्री ॥ रुक्याची आस धरूनी । हालवीती फुदी ॥३॥ थोरे घरीं करी फेरी । तेथें नाचें बरी ॥ जेथें निघे रुका । तेथें हालवी टिरी ॥ ४ ॥ आंत भांग बाहेर चांग । सौरी ती नव्हे तेग ॥ तुका दास नटतसे । न करी साचा संग ॥ ५ ॥

॥ ६९७३ ॥ चाल माझ्या राघो । डोंगरीं दिवा लागो ॥ १ ॥ घर केलें दार केलें । घरीं नाहीं वरो ॥ सेजारणी पापिणीचीं । पांच पोरें मरो ॥ २ ॥ घरीं पांच पोरें । तीं मजहूनि आहेत थोरें ॥ पांचांच्या बळें । खादलीं बावन केळें ॥ ३ ॥ घर केलें दार केलें । दुकान केला मोटा ॥ पाटाची राणी । धांगडधिंगा तिचा मोठा ॥ ४ ॥ दुकान केला मोटा । पदरीं तर

खोटा ॥ हिजडा ह्मणसी जोगी । तर सोहळा सहस्र भोगी ॥ तुका ह्मणे वेगीं । तर हरि ह्मणा जगीं ॥ ५ ॥

॥ ६९७४ ॥ तीन माचवी चार गाती त्यावर निजलें होतें ॥ त्यां० ॥ रामनामीं मिळुन गेलें खाटलें पडलें रीतें ॥ १ ॥ सौरी झालें बाई नाहीं त्याचें पाई ॥ ना० ॥ २ ॥ होउनी वेडी घालीत फुगडी गेलें राउळांत ॥ गे० ॥ मला पाहुन देव भ्याला नाहीं देउळांत ॥ सौरी झा० ॥ ३ ॥ होउनी वेडी फाडीत लुगडीं नाचें आळोआळी ॥ ना० ॥ मागें पुढें रुंदावली झालें गणोबाचीं ॥ सौरी झा० ॥ ४ ॥ तुका ह्मणे सौरी झालें दादया मला भ्याला ॥ दा० ॥ संग नसतां पोरें झालीं काय सांगूं तुला । सौरी झालें बाई नाहीं० ॥ ४ ॥

॥ ६९७५ ॥ जन्मा आलिया गेलिया परी। भक्ति नाहीं केली ॥ माझें माझें ह्मणोनियां । गुंतगुंतों मेलीं ॥ १ ॥ येथें कांहीं नाहीं । लव गुरूच्या पायीं ॥ चाल रांडे टाकी रुका । नको करूं बोल ॥ गुरुविण मार्ग नाहीं । करिसी तें फोल ॥ २ ॥ खाऊनी जेउनी लेऊनी नेसुनी । ह्मणती आह्मी बऱ्या ॥ साधु संत घरा आल्या । होती पाठमोऱ्या ॥ ३ ॥ वाचोनी पढोनी झालें शाहणे । ह्मणती आह्मी संत ॥ परनारी देखोनी त्यांचें । चंचळ झालें चित्त ॥ ४ ॥ टिळा टोपी घालुनी माळा । ह्मणती आह्मी साधु ॥ दयाधर्म चित्तीं नाहीं । ते जाणावे भोंदु ॥ ५ ॥ कलियुगीं घरोघरीं । संत झाले फार ॥ वीतभरी पोटासाठीं । हिंडती दारोदार ॥ ६ ॥ संत ह्मणती केली निंदा । निंदा नव्हे भाई ॥ तुका असे अनन्यें भावें । शरण संता पायीं ॥ ७ ॥

॥ ६९७६ ॥ लय लक्ष जाण अलक्ष धरी गुरुचा पक्ष । तेणें जिणें उत्तमवाणें होसी धीटपणें साक्ष ॥ १ ॥ चाल गुरु बहिणी सखिये साजणी ॥ २ ॥ भावाबळें साहे मुळें खोउनी कासोटा । माझें तुझें सारूनी मागें लाग मुळींच्या वाटा ॥ ३ ॥ एक झाटीं भावापाठीं बैस माझ्या गोष्टीं । धीर माझा साहे तुझा जाणे भाव निष्टी ॥ ३ ॥ बोल सांडी उग्या तोंडीं टाक रुका आशा । नाहीं तरी होती परी झिंजा ओढी कैशा ॥ ४ ॥ एक माझें टाक तुझें नको पाठमोरी । तुका ह्मणे जाणा खूण ह्मणा रामकृष्णहरी ॥ ४ ॥

॥ ६९७७ ॥ वेणी फणी दांत सिर्णी विचारिलें जनीं । घे आरिसा भांग सरिसा पाहे दांत विचकोमी ॥ १ ॥ मोडी डोळे करी चाळे जना

दावी लिले । काजळ सोंग करी चांग हात बडवी डोळे ॥ २ ॥ चाल माझ्या भावा वेध लागो जिवा ॥ ३ ॥ पाहे सौरी नाचे फेरी सावलें करी वरी हाता रुका जेव्हां एका हारिखे अंतरीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे होईं जाणे सांडि लाज मान । तेव्हां जन करी मान सौरी बरी होणें ॥ ५ ॥

॥ ६९७८ ॥ सौरी जिणें धणी माने तरी श्लाघ्य दिसे । नाहीं तरी व्यर्थ परी दोहीं बाहीं हासें ॥ १ ॥ स्मरा रामराम । तेव्हां फिटे भ्रम ॥ २ ॥ टाका ओझें मी तुं माझें भार शिरीं ओझें । ठकसी गे निरयभागें संसारीच्या माजें ॥ ३ ॥ तुका ह्मणे सावधान धणी राखे रुजू । यमाघरीं दंड देतां कोण सोडी उजू ॥ ४ ॥

॥ ६९७९ ॥ अनंत जुगाचा देव्हारा । निजबोधाचा घुमारा ॥ अवचिता-भरला वारा । या मल्लारी देवाचा ॥ १ ॥ शुद्धसत्वाचा कवडा मोठा । बोधबिरडें बांधला गांठा ॥ गळां वैराग्याचा पट्टा । वाटा दावूं या भक्तीच्या ॥ २ ॥ हृदय कोटंबा सांगातें । घोळ वाजवूं अनुहातें ॥ ज्ञानभंडाराचें पोतें । रितें नव्हे कल्पांतीं ॥ ३ ॥ लक्ष चौऱ्याशीं घरें चारी । या जन्माची केली वारी ॥ प्रसन्न झाला देव मल्लारी । सोहंभावीं राहिलों ॥ ४ ॥ या देवाचें भरतां वारें । अंगीं प्रेमाचें फेंपरें ॥ गुरुगुरु करी वेडे चारें । पाहा तुकें भुंकविलें ॥ ५ ॥

---

## ललित, अभंग.

॥ ६९८० ॥ आजी दिवस झाला । धन्य सोनियाचा भला ॥ १ ॥ झालें संताचे पंगती । बरवें भोजन निगुती ॥ २ ॥ रामकृष्णनामें । बरवीं मोहियेलीं प्रेमें ॥ ३ ॥ तुका ह्मणे आला । चवी रसाळहा काला ॥ ४ ॥

॥ ६९८१ ॥ तुह्मी तरी सांगा कांहीं । आह्मांविशीं रखुमाबाई ॥ १ ॥ कांहीं उरलें तें ठायीं । वेगीं पाठवूनी देईं ॥ २ ॥ टोकत बैसलों देखा । इच्छीतसें ग्रासा एका ॥ ३ ॥ प्रेम देउनि बहुडा झाला । तुका ह्मणे विठ्ठल बोला ॥ ४ ॥

॥ ६९८२ ॥ वाट पाहें बाहे निढळीं ठेवूनियां हात । पंढरीचे वाटे दृष्टि लागलें चित्त ॥ १ ॥ कईं येता देखें माझा मायबाप । घटिका बोटें दिवस

लेखीं धरूनियां माप ॥ २ ॥ डावा डोळा लवे उजवी स्फुरते बाहे । मन उतावीळ भाव सांडुनियां देहे ॥ ३ ॥ सुखसेजे गोडचित्तीं न लगे आणिक । नाठवे घर दार तान पळाली भूक ॥ ४ ॥ तुका ह्मणे धन्य दिवस ऐसा तो कोण । पंढरीचे वाटे येतां मूळ देखेन ॥ ५ ॥

॥ ६९८३ ॥ तुझें दास्य करूं आणिका मागों खावया । धिग् झालें जिणें माझें पंढरीराया ॥ १ ॥ काय गा विठोबा तुज आतां ह्मणावें । शुभाशुभ गोड तुम्हां थोरांच्या दैवें ॥ २ ॥ संसाराचा धाक निरंतर आह्मांसी । मरण भलें परि काय अवकळा ऐसी ॥ ३ ॥ तुझे शरणागत शरण जाऊं आणिकांसी । तुका म्हणे कवणा लाज हे कां नेणसी ॥ ४ ॥

॥ ६९८४ ॥ पुरविली आळी । जे जे केली ते ते काळीं । ॥ १ ॥ माय तरी ऐसी सांगा । कृपाळुवा पांडुरंगा ॥ २ ॥ घेतलें नुतरी । उचलूनी कडियेवरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे घांस । मुखीं घाली ब्रह्मरस ॥ ४ ॥

॥ ६९८५ ॥ कथेची सामग्री । देह अवसानावरी ॥ १ ॥ न को जाऊं देऊं भंगा । गात्रें माझी पांडुरंगा ॥ २ ॥ आयुष्य करी उणें । परि मज आवडो कीर्तन ॥ ३ ॥ तुका ह्मणे हाणी । या वेगळी मना नाणीं ॥ ४ ॥

॥ ६९८६ ॥ रत्नजडित सिंहासन । वरी बैसले आपण ॥ १ ॥ कुंचे ढळती दोहीं बाहीं । जवळी रखुमाई राही ॥ २ ॥ नाना उपचारी । सिद्धि वोळगती कामारी ॥ ३ ॥ हातीं घेऊनि पादुका । उभा बंदिजन तुका ॥४॥

॥ ६९८७ ॥ हिरा शोभला कोंदणीं । जडित माणिकांची खाणी ॥ ॥ १ ॥ तैसा दिसे नारायण । मुख सुखाचें मंडण ॥ कोटि चंद्रलीळा ॥ पूर्णिमेच्या पूर्ण कळा ॥ ३ ॥ दोन्ही बाहीं संत सभा । सिंहासनीं राजा उभा ॥ ४ ॥ नारद तुंबर गाती । प्रेम आल्हादें गर्जती ॥ ५ ॥ तुका ह्मणे दृष्टि धाये । परतोनि माघारी ते न ये ॥ ६ ॥

॥ ६९८८ ॥ पतित पतित । परी मी त्रिवाचा पतित ॥ १ ॥ परि तूं आपुलिया सत्ता । मज करावें सरता ॥ २ ॥ नाहीं चित्तशुद्धि । स्थिर पायांपाशीं बुद्धि ॥ ३ ॥ अपराधाचा केलों । तुका ह्मणे किती बोलों ॥४॥

॥ ६९८९ ॥ उभारिला हात । जगीं जाणविली मात ॥ १ ॥ देव बैसले सिंहासनीं । आल्या याचका होय धनी ॥ २ ॥ एकाच्या कैवाडें । उगवे बहुतांचें कोडें ॥ ३ ॥ दोहीं ठायीं तुका । नाहीं पडों देत चुका ॥४॥

# आशीर्वाद अभंग.

॥ ६९९० ॥ जीवेंसाटीं यत्न भाव । त्याची नाव बळकट ॥ १ ॥ पैल तीरा जातां कांहीं । संदेह नाहीं भवनदी ॥ २ ॥ विश्वासाची धन्य जाती । तेथें वस्ती देवाची ॥ ३ ॥ तुका ह्मणे भोळियांचा । देव साचा अंकित ॥ ४ ॥

॥ ६९९१ ॥ आशीर्वाद तया जाती । आवडी चित्तीं देवाची ॥ १ ॥ कल्याण तें असें क्षेम । वाढें प्रेम आगळें ॥ २ ॥ भक्तिभाग्य गांठीं धन । त्या नमन जीवासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरिचे दास । तेथें आस सकळ ॥ ४ ॥

॥ ६९९२ ॥ तया साठीं वेचूं वाणी । आइको कानीं वारता ॥ १ ॥ क्षेम माझे हरीजन । समाधान पुसतां त्यां ॥ २ ॥ परत्रींचे जे सांगाती । त्याची याती न विचारीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे धैर्यवंतें । निर्मळचित्तें सरतीं तीं ॥ ४ ॥

॥ ६९९३ ॥ अभय उत्तर संतीं केलें दान । झालें समाधान चित्त तेणें ॥ १ ॥ आतां प्रेमरसें न घडे खंडण । द्यावें कृपादान नारायणा ॥ २ ॥ आलें जें उचित देहविभागासी । तेणें पायांपासीं उभीं असों ॥ ३ ॥ तुका ह्मणे करी पूजन वैखरी । बोबडा उत्तरीं गातों गीत ॥ ४ ॥

॥ ६९९४ ॥ असो मंत्रहिन क्रिया । नका चर्या विचारूं ॥ १ ॥ सेवेमधीं जमा धरा । कृपा करा शेवटीं ॥ २ ॥ विचारूनी ठाया ठाव । येथें भाव राहिला ॥ ३ ॥ आतां तुकयापाशीं हेवा । नाहीं देवा तांतडी ॥ ४ ॥

॥ ६९९५ ॥ झाली पाकासिद्धि वाट पाहे रखुमाई । उदक तापलें डेरां चीकसा मर्दुनी पाईं ॥ १ ॥ उठा पांडुरंगा उशीर झाला भोजनीं । उभ्या आंचवणा गोपी कळस घेऊनी ॥ २ ॥ अवघ्या सावचित्त सेवेलागीं सकळा । उद्धव अक्रूर आले पाचारूं मुळा ॥ ३ ॥ सावरिली सेज सुमनयाति सुगंधा । रत्नदीप ताटीं वाळा विडिया विनोदा ॥ ४ ॥ तुका विनंति करी पाहे पंढरीराणा । असा सावचित्त सांगे सकळा जना ॥ ५ ॥

॥ ६९९६ ॥ उठा सकळ जन उठिले नारायण। आनंदले मुनिजन तिन्ही लोक ॥ १ ॥ करा जयजयकार वाद्यांचा गजर। मृदंग विणे अपार टाळ घोळ ॥ २ ॥ जोडोनियां कर मुख पाहा सादर। पायावरी शिर ठेवूनियां ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय पढियेंतें तें मागा। आपुलालें सांग सुख दुःख ॥ ४ ॥

॥ ६९९७ ॥ करूनी विनवणी पायीं ठेवीं माथा। परिसावी विनंति माझी पंढरीनाथा ॥ १ ॥ अखंडित असावेंसे वाटतें पायीं। साहोनी संकोच ठाव थोडासा देईं ॥ २ ॥ असो नसो भाव आलों तुझिया ठाया। पाहें कृपादृष्टी मज पंढरीराया ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मी तुझीं वेडीं वांकडीं। नामें भवपाश हातें आपुल्या तोडीं ॥ ४ ॥

॥ ६९९८ ॥ घडिया घालूनी तळीं चालती वनमाळी। उमटती कोमळीं कुंकुमाचीं ॥ १ ॥ वंदा चरणरज अवघे सकळ जन। तारियेले पाषाण उदकीं जेणें ॥ २ ॥ पैस धरूनी चला ठाकत ठायीं ठायीं। मौन्य धरूनी कांहीं न बोलावें ॥ ३ ॥ तुका अवसरु जाणवितो पुढें। उघडलीं महाल मंदिरें कवाडें ॥ ४ ॥

॥ ६९९९ ॥ भीतरी गेले हरी राहा क्षणभरी। होईल फळ धीर करावा ॥ १ ॥ न करीं त्वरा ऐकें मात। क्षण एक निवांत बैसावें ॥ २ ॥ करूनी मर्दन सारिलें पाणी। न्हाले देव अंग पुसी भवानी ॥ ३ ॥ नेसला सोनसळा विनवी रखुमाई। वाढिलें आतां ठायीं चलावें जी ॥ ४ ॥ करूनियां भोजन घेतलें आंचवण। आनंदें नारायण पहुडले ॥ ५ ॥ तुका मात जाणवी आतां। सकळां बहुतां होती चित्तीं ॥ ६ ॥

॥ ७००० ॥ द्या जी आह्मां कांहीं सांगा जी रखुमाई। शेष उरलें ठायीं सनकादिकांचें ॥ १ ॥ टोकत बाहेरी बैसलों आशा। पुराया ग्रासा एकमेकां ॥ २ ॥ येथवरी आलों तुझिया नांवें। आस करूनी आह्मी दातारा ॥ ३ ॥ प्रेम देऊनियां बहुडा आतां दिला। तुका ह्मणे आतां विठ्ठल बोला ॥ ४ ॥

॥ ७००१ ॥ बहुडाविले जन मन झालें निश्चळ। चुकवूनी कोल्हाळ आला तुका ॥ १ ॥ पर्यंकीं निद्रा करावें शयन। रखुमाई आपण समवेत ॥ २ ॥ घेऊनियां आलों हातीं टाळ वीणा। सेवेसी चरणा स्वामीचियां ॥ ३ ॥ तुका ह्मणे आतां परिसावीं सादरें। बोबडीं उत्तरें पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ७००२ ॥ नाच गाणें माझा जवळील ठाव । निरोपीन भाव होईल तो ॥ १ ॥ तुह्मां निद्रा मज आज्ञा ते स्वभावें । उतरूनी जिवें जाईन लोण ॥ २ ॥ एकाएकीं बहू करीन सुस्वरें । मधुर उत्तरें आवडीनें ॥ ३ ॥ तुका ह्मणे तूं जगदानी उदार । फेडशील भार एक वेळे ॥ ४ ॥

॥ ७००३ ॥ सिणलेती सेवकां देउनी इच्छादान । केला अभिमान अंगीकारा ॥ १ ॥ अहो दीनानाथा आनंदमुरती । तुह्मांसी शोभती ब्रीदें ऐसीं ॥ २ ॥ बहुतांनीं विनविलें बहुतां प्रकारीं । सकळां ठायीं हरी पुरलेती ॥ ३ ॥ तुका म्हणे अगा कुटुंबवत्सळा । कोण तुझी लीळा जाणे ऐसी ॥ ४ ॥

॥ ७००४ ॥ पावला प्रसाद आतां उठोनी जावें । आपला तो श्रम कळों येतसें जीवें ॥ १ ॥ आतां स्वामी सुखें निद्रा करा गोपाळा । पुरले मनोरथ जातों आपुलिया स्थळा ॥ २ ॥ तुह्मांसी जागवूं आह्मी आपुलिया चाडा । शुभाशुभ कर्मे दोष वाराया पीडा ॥ ३ ॥ तुका ह्मणे दिलें उच्छिष्टाचें भोजन । आह्मां आपुलिया नाहीं निवडिलें भिन्न ॥ ४ ॥

॥ ७००५ ॥ उठोनियां तुका गेला निजस्थळा । उरले राउळामाजी देव ॥ १ ॥ निउल झालें सेवका स्वामीचें । आज्ञें करूनी चित्त समाधान ॥ २ ॥ पहुडलिया हरी अनंतशयनावरी । तेथें नाहीं उरी कांहीं काम ॥ ३ ॥ अवघी बाहेर घालूनी गेला तुका । सांगितलें लोकां निजले देव ॥ ४ ॥

## दसरा.

॥ ७००६ ॥ करूनी आरती । आतां ओवाळूं श्रीपती ॥ १ ॥ आजी पुरले नवस । धन्य झाला हा दिवस ॥ २ ॥ पाहा वो सकळा । पुण्यवंता तुह्मी बाळा ॥ ३ ॥ तुका वाहे टाळी । होता सन्निध जवळी ॥ ४ ॥

॥ ७००७ ॥ द्याल माळ जरी पडेन मी पायां । दंडवत वांयां कोण वेची ॥ १ ॥ आलें तें हिशोबें अवघिया प्रमाण । द्यावें तरी दान मान हो तो ॥ २ ॥ मोकळिया मनें द्याल जरी सेवा । प्रसाद पाठवा लवकरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुह्मी झालिया कृपण । नामाची जतन मग कैंची ॥ ४ ॥

॥ ७००८ ॥ तुह्मी जावें निजमंदिरा । आह्मी जातों आपुल्या घरा ॥ १ ॥ विठोबा लोभ असों देई । आह्मी असों तुमचें पायीं ॥ २ ॥ चित्त करी सेवा । आह्मीं जातों आपुल्या गांवा ॥ ३ ॥ तुका ह्मणे दिशा भुल-लों । फिरोनी पायापाशीं आलों ॥ ४ ॥

॥ ७००९ ॥ झाली पाकसिद्धि सकळ । आली भोजनाची वेळ ॥ १ ॥ तापउनी पाणी । उभ्या सिद्ध दासी जनी ॥ २ ॥ चुवा अरगजा चंदन । सुंदर करुनी उटणें ॥ ३ ॥ बोलाऊं पाठविला तुका । चला पाक झाला निका ॥ ४ ॥

॥ ७०१० ॥ देव चालिले घरांत । धरुनी उद्धवाचा हात ॥ १ ॥ भक्त गर्जती महाद्वारीं । देव चालिले मंदिरीं ॥ २ ॥ तुका ह्मणे भक्त जगा । कांहीं देवाजीसी मागा ॥ ३ ॥

॥ ७०११ ॥ घडिया घालुनी रुक्मिणी । देव चालती वरुनी ॥ १ ॥ सुंदर उमटती पाउलें । चिन्ह ध्वजांकित रेखिलें ॥ २ ॥ उद्धव अक्रुर दोहीं कडे । तुका चालतसे पुढें ॥ ३ ॥

॥ ७०१२ ॥ देव उठले स्नानासी । उटणें मर्दिती त्या दासी ॥ १ ॥ सुगंधित तेलें । तेणें देवा चर्चियेलें ॥ २ ॥ मग करुनिया स्नान । करी पीतांबर परिधान ॥ ३ ॥ रत्न जडित बैसावया । पाट देत जगमाया ॥ ४ ॥ तुका ह्मणे वर्णूं कायीं । घेतों आलाई बलाई ॥ ५ ॥

॥ ७०१३ ॥ ताट विस्तारी रुक्मिणी । जेवा ह्मणे चक्रपाणी ॥ १ ॥ नानापरीचीं पक्वान्नें । मांडे पोळ्या परिपूर्ण ॥ २ ॥ पत्रशाखाचा तो थाट । फळशाखा घनदाट ॥ ३ ॥ नानापरीच्या त्या क्षिरी । आणि साठी कोशिंबिरी ॥ ४ ॥ शुद्ध साळीचा तो भात । वरी वरण शोभत ॥ ५ ॥ सद्यस्तप्त असे तुप । शुद्ध साजूक अमूप ॥ ६ ॥ देवा सावकाश जेवावें । विनवी विश्वमाता भावें ॥ ७ ॥ भोजन करूनी उठले । मग देव आंचवले ॥ ८ ॥ तेथें ठोंकतसे तुका । पाहे प्रसाद तो निका ॥ ९ ॥

॥ ७०१४ ॥ पाहें प्रसादाची वाट । द्यावें धोवोनिया ताट ॥ १ ॥ शेष घेऊनी जाईन । तुमचें झालिया भोजन ॥ २ ॥ झालों एकसवा । तुह्मां आडूनियां देवा ॥ ३ ॥ तुका ह्मणे चित्त । करूनी राहिलों निश्चिंत ॥ ४ ॥

॥ ७०१५ ॥ केली कटकट गाऊं नाचों नेणतां । लाज नाहीं भय आह्मां कोणाची चिंता ॥ १ ॥ बैसा सिणलेती पाय रगडुं दातारा । जाणवूं

घा धारा उब झाली शरीरा ॥ २ ॥ उशिरा उशीर किती काय म्हणावा । जननिये बाळका कोप कांहीं न धरावा ॥ ४ ॥ तुझिये संगतीं आह्मी करूं कोल्हाळ । तुका ह्मणें बाळें अवघीं मिळोन गोपाळ ॥ ४ ॥

॥ ७०१६ ॥ प्रसाद पावला । आतां सर्व तुह्मी चला ॥ १ ॥ सकळां झालासे आल्हाद । मुखीं नामाचा तो छंद ॥ २ ॥ नका करूं गलबला । तुका सांगे सकळांला ॥ ३ ॥

॥ ७०१७ ॥ आतां सुखें निद्राकरा । आह्मी जातों आपुल्या घरा ॥ १ ॥ पुरले मनोरथ । झालों आनंदभरीत ॥ २ ॥ पावलों उच्छिष्ट भोजन । तेणें धालें आमचें मन ॥३ ॥ झोंप घ्यावी हो निश्चित। ऐसें तुका विनवीत ॥ ४ ॥

॥ ७०१८ ॥ उठोनियां संत गेले । हरिनामें सर्व धाले ॥ १ ॥ मन ठेऊनी हरिपायीं । आपण होऊनी विदेही ॥ २ ॥ हरिसुखें सुखरूप । तुका झाला ब्रह्मरूप ॥ ३ ॥

॥ ७०१९ ॥ आरुष शब्द बोलों मनीं न धरावें कांहीं । लडिवाळ बाळकें तूंचि आमुची आई ॥ १ ॥ देईं गे विठाबाई प्रेमभातुकें । अवघियां कवतुकें लहानां थोरां सकळां ॥ २ ॥ असो नसो भाव आलों तुझिया ठाया । पाहें कृपादृष्टी आतां पंढरीराया ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मी तुझीं वेडीं वांकुडीं । नामें भवपाश आतां आपुलिया तोडीं ॥ ४ ॥

॥ ७०२० ॥ आडकलें देवद्वार । व्यर्थ काय करकर ॥ १ ॥ आतां चला जाऊं घरा । नका करूं उजगरा ॥ २ ॥ देवा लागलीसे निज । येथें उभ्यास काय काज ॥ ३ ॥ राग येतो देवा । तुका म्हणे नेघे सेवा ॥ ४ ॥

---

## घोंगड्याचे अभंग.

---

॥ ७०२१ ॥ घोंगडियांचा पालट केला । मुलांमुलां आपुल्यांत ॥ १ ॥ कान्होबा तो मीच दिसें । लाविलें पिसें संवगडियां ॥ २ ॥ तो बोले मी उगाच बैसें । अनारिसें न दिसे ॥ ३ तुका ह्मणे दिलें सोंग । नेदी व्यंग जाऊं देऊं ॥ ४ ॥

॥ ७०२२ ॥ खेळों लागलों सुरकवडी । माझी घोंगडी हारपली ॥ १ ॥ कान्होबाचे पडिलों गळां । घेईं गोपाळा देईं झाडा ॥ २ ॥ मी बो हागे

उघडा झालों । अवघ्या आलों बाहेरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे बुद्धि काची । नाहीं ठायींची मजपाशीं ॥ ४ ॥

॥ ७०२३ ॥ घोंगडियांची एकी राशी । त्याचपाशीं तें ही होतें ॥ १ ॥ माझियाचा माग दावा । केला गोवा उगवों द्या ॥ २ ॥ व्हावें ऐसें निसंतान । घेईन आन तुजपाशीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे लाहान मोठा । सांडा ताठा हा देवा ॥ ४ ॥

॥ ७०२४ ॥ नाहीं तुझें उगा पडत गळां । पुढें गोपाळा जाऊं नको ॥ १ ॥ चाहाड तुझें दाविन घरीं । बोलण्या उरी नाहीं ऐसी ॥ २ ॥ तुह्मां आह्मां पडदा होता । सरला आतां सरोवरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे उरती गोठी । पडिली मिठी न सुटे ॥ ४ ॥

॥ ७०२५ ॥ तुह्मां अह्मां उरी तोंवरी । जनाचारी ऐसे तैसी ॥ १ ॥ माझें घोंगडें टाकून देईं । एके ठायीं मग असों ॥ २ ॥ विरोधानें पडे तुटी । कपट पोटीं नसावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे तूं जाणता हरी । मज वेव्हारीं बोलविसी ॥ ४ ॥

॥ ७०२६ ॥ मुळींचा तुह्मां लागला चाळा । तो तो गोपाळा न संडा ॥ १ ॥ घ्यावें त्यांचें देणेंचि नाहीं । येचि बाहीं देखतसों ॥ २ ॥ माझी तरी घोंगडी मोठी । गांडीची लंगोटी सोडीस ना ॥ ३ ॥ तुका म्हणे म्यां सांडिली आशा । हुंगिला फांसा येथूनियां ॥ ४ ॥

॥ ७०२७ ॥ घोंगडियास घातली मिठी । न सोडी साटी केली जीवें ॥ १ ॥ हा गे चोर धरा धांवा कोणी । घरांत राहाटे चहूं कोनीं ॥ २ ॥ नोळखवे म्यां धरिला हातीं । देहा दीप माय लाविली वाती ॥ ३ ॥ न पावे धांवणें मारितो हाका । जनाचारीं तुका नागवला ॥ ४ ॥

॥ ७०२८ ॥ आतां मी देवा पांघरों काई । भिकेचें तें ही उरेचिना ॥ १ ॥ सदैव दुबळें नेणें चोर । देखोनि सुनाट फोडितो घर ॥ २ ॥ नाहीं मजपाशीं फुटकी फोडी । पांचांनीं घोंगडी दिली होती ॥ ३ ॥ तुका ह्मणे जना वेगळें झालें । एकचि नेलें एकुल्याचें ॥ ४ ॥

॥ ७०२९ ॥ मी माझें करीत होतों जतन । भीतरिल्या चोरें घेतलें खानें ॥ १ ॥ मज आल्याविण आधींच तो होता । मज न कळतां मज माजी ॥ २ ॥ घोंगडें नेलें घोंगडें नेलें । उघडें केलें उघडेंचि ॥ ३ ॥ तुका ह्मणे चोरटाचि झाला साव । सहजचि न्याय नाहीं तेथें ॥ ४ ॥

॥ ७०३० ॥ घोंगडें नेलें सांगों मी कोणा । दुबळें माझें नाणीती मना ॥ १ ॥ पुढें तें मज न मिळे आतां । जवळी सत्ता दाम नाहीं ॥ २ ॥ सेटे महाजन ऐका कोणी । घोंगडियाची करा शोधणी ॥ ३ ॥ घोंगडियाचा करा बोभाट । तुका ह्मणे जंव भरला हाट ॥ ४ ॥

॥ ७०३१ ॥ माझें घोंगडें पडिलें ठायीं । माग तया पायीं सांपडला ॥ ॥ १ ॥ चोर तो भला चोर तो भला । पाठिसी घातला पुंडलीकें ॥ २ ॥ चोर कुठोरी एकेचि ठायीं । वेगळें पाहावें न लगे कांहीं ॥ ३ ॥ आणिकांचीं ही चोरलीं आधीं । माझें तयामधीं मेळविलें ॥ ४ ॥ आपल्या आपण शोधिलें तिहीं । करीन मी ही तेचि परी ॥ ५ ॥ तुका ह्मणे माझें हितचि झालें । फाटकें जाऊन धडकें आलें ॥ ६ ॥

---

## रामचरित्र. अंभग.

---

॥ ७०३२ ॥ रामा वनवास । तेणें वसे सर्व देश ॥ १ ॥ केलें नामाचें जतन । समर्थ तो नव्हे भिन्न ॥ २ ॥ वनांतरीं रडे । ऐसे पुराणीं पवाडे ॥ ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऋषिनेम । ऐसा कळोनी कां भ्रम ॥ ४ ॥

॥ ७०३३ ॥ राम ह्मणे ग्रासोग्रासीं । तोचि जेविला उपवासी ॥ १ । धन्यधन्य तें शरीर । तीर्थांव्रतांचें माहेर ॥ २ ॥ राम ह्मणे करितां धंदा सुखसमाधि त्या सदा ॥ ३ ॥ राम ह्मणे वाट चाली । यज्ञ पाउलापाउलीं ॥ ४ ॥ राम ह्मणे भोगीं त्यागीं । कर्म न लिंपे त्या अंगीं ॥ ५ ॥ ऐसा राम जपे नित्य । तुका ह्मणे जीवन्मुक्त ॥ ६ ॥

॥ ७०३४ ॥ तारी ऐसे जड । उदकावरी जो दगड ॥ १ ॥ तो हा न करी तें कायी । कां रे लीन नव्हां पायीं ॥ २ ॥ सीळा होती मनुष्य झाली । ज्याच्या चरणाचे चाली ॥ ३ ॥ वानरां हातीं लंका । घेवविली म्हणे तुका ॥ ४ ॥

॥ ७०३५ ॥ राम चालले लंकेसी । अहो सीता आणायासी ॥ ॥ १ ॥ पुढें समुद्र देखिला । नळराजा बोलविला ॥ २ ॥ शिळासेतू बांधोनी । राम गेले उतरुनी ॥ ३ ॥ अहो तुका ह्मणे नळ । भक्त आहे हो प्रेमळ ॥ ४ ॥

॥ ७०३६ ॥ राम ह्मणतां रामचि होईजे । पदीं बैसोन पदवी घेइजे ॥ १ ॥ ऐसें सुख वचनीं आहे । विश्वासें अनुभव पाहे ॥ २ ॥ रामरसाचि-या चवी । आन रस रुचती केवीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे चाखोनी सांगें । मज अनुभव आहे अंगें ॥ ४ ॥

॥ ७०३७ ॥ रामराम उत्तम अक्षरें । कंठीं धरिलीं आपण शंकरें ॥ १ ॥ कैसी तारक उत्तम तिहीं लोकां । हळाहळ शीतळ केलें शिवा देखा ॥ २ ॥ हाचि मंत्र उपदेश भवानी । तिच्या चुकल्या गर्भादियोनि ॥ ३ ॥ जुनाट नागरनीच नवें । तुका ह्मणे म्यां धरिलें जीवें भावें ॥ ४ ॥

॥ ७०३८ ॥ राम ह्मणतां तरे जाणतां नेणतां । हो का यातिभलता कुळहीन ॥ १ ॥ राम ह्मणतां न लगे आणीक सायास । केले महा दोष तेही जळती ॥ २ ॥ राम ह्मणे तया जवळी नये भूत । कैंचा यमदूत ह्मणतां राम ॥ ३ ॥ राम म्हणतां तरे भवसिंधुपार । चुके येरझार म्हणतां राम ॥ ४ ॥ तुका म्हणे हें सुखाचें साधन । सेवी अमृतपान एका भावें ॥ ५ ॥

॥ ७०३९ ॥ पैल आला राम रावणासी सांगती । काय निदसुरा नि-जलासी भूपति ॥ १ ॥ अवघे लंकेमाजी झाले रामाचे दूत । व्यापिलें सर्वत्र बाहेरी भीतरी आंत ॥ २ ॥ अवघे अंगलग तुझें वधियेले वीर । होईं शरणागत किंवा युद्धासी सादर ॥ ३ ॥ तुका ह्मणे एक्या भावें रामासी भे-टी । करूनी घेईं आतां संबंधेसी तुटी ॥ ४ ॥

॥ ७०४० ॥ समरंगणा आला । रामें रावण देखिला ॥ १ ॥ कैसे भीडतील दोन्ही । नांव सारूनियां रणीं ॥ २ ॥ प्रेमसुखाचें संधान । बाणें निवारिती बाण ॥ ३ ॥ तुकयास्वामी रघुनाथ । वर्म जाणोनी केली मात ॥ ४ ॥

॥ ७०४१ ॥ केला रावणाचा वध । अवघा तोडिला संबंध ॥ १ ॥ लंकाराज्य बिभीषणा । केली चिरकाळ स्थापना ॥ २ ॥ औदार्याची सीमा । काय वर्णूं रघुरामा ॥ ३ ॥ तुका म्हणे माझा दाता । रामें सोडविली सीता ॥ ४ ॥

॥ ७०४२ ॥ रामरूप केली । रामें कौसल्या माउली ॥ १ ॥ राम रा-हिला मानसीं । ध्यानीं चिंतनीं जयासी ॥ राम होय त्यासी । संदेह नाहीं हा भरंवसा ॥ २ ॥ अयोध्येचे लोक । राम झाले सकळीक ॥ ३ ॥ स्मरतां जानकी । रामरूप झाले कपि ॥ ४ ॥ रावणेंसि लंका । राम आपण झाला देखा ॥ ५ ॥ ऐसा नित्य राम ध्याय । तुका वंदी त्याचे पाय ॥ ६ ॥

॥ ७०४३ ॥ आनंदले लोक नरनारी परिवार । शंखभेरीतुरें वाद्यांचे गजर ॥ १ ॥ आनंद झाला अयोध्येसी आले रघुनाथ । अवघा जयजयकार आळंगिला भरत ॥ २ ॥ करिती अक्षवाणें ओंवाळिती रघुवीरा । लक्ष्मीसहित लक्ष्मण दुसरा ॥ ३ ॥ झालें रामराज्य आनंदलीं सकळें । तुका म्हणे गाईवत्सें नरनारीबाळें ॥ ४ ॥

॥ ७०४४ ॥ झालें रामराज्य काय उणें आह्मांसी । धरणी धरी पीक गाई वोळल्या ह्मैसी ॥ १ ॥ राम वेळोवेळां आह्मी गाऊं ओवियें । दळितां कांडितां जेवितां गे बाइये ॥ २ ॥ स्वप्नींही दुःख कोणी न देखे डोळां । नामाच्या गजरें भय सुटलें काळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे रामें सुख दिलें आपुलें । तयां गर्भवासीं येणें जाणें खुंटलें ॥ ४ ॥

॥ ७०४५ ॥ अहल्या जेणें तारिली रामें । गणिका परलोका नेली नामें ॥ १ ॥ रामहरे रघुराजहरे । रामहरे महाराजहरे ॥ २ ॥ कंठ शीतळ जपतां शूळपाणी । राम जपतां अविनाश भवानी ॥ ३ ॥ तारक मंत्र श्रवण काशी । नाम जपतां वाल्मीक ऋषि ॥ ४ ॥ नामजप बीजमंत्र नळा । सिंधु तरती ज्याच्या प्रतापें शिळा ॥ ५ ॥ नामजप जीवन मुनिजना । तुकयास्वामी रघुनंदना ॥ ६ ॥

॥ ७०४६ ॥ मी तो अल्पमतिहीन । काय वर्णूं तुझे गुण ॥ उदकीं तारिले पाषाण । हें महिमान नामाचें ॥ १ ॥ नाम चांगलें चांगलें । माझे कंठीं राहो भलें ॥ कपिकुळ उद्धारिलें । मुक्त केलें राक्षसां ॥ २ ॥ द्रोणागिरि कपि हातीं । आणविला सीतापति ॥ थोर केली ख्याति । भरतभेटीसमयीं ॥ ३ ॥ शिळा होती मनुष्य झाली । थोर कीर्ति वाखाणिली ॥ लंका दहन केली । हनुमंतें काशानें ॥ ४ ॥ राम जानकीजीवन । योगियांचें निजध्यान ॥ राम राजीवलोचन । तुका चरण वंदितो ॥ ५ ॥

॥ ७०४७ ॥ साही शास्त्रां अतिदुरी । तो परमात्मा श्रीहरि ॥ तो दशरथाचे घरीं । क्रीडतो राम ॥ १ ॥ शिवाचें निजध्येय । वाल्मीकाचें निजगुह्य ॥ तो भिल्लटीचीं फळें खाय । श्रीराम तो ॥ २ ॥ योगियांचे मनीं । नातुडे चिंतनीं ॥ तो वानरांचे कानीं । गोष्टी सांगे ॥ ३ ॥ चरणें शिळा उद्धरी । नामें गणिका तारी ॥ तो कोळिया घरीं । पाहुणा राम ॥ ४ ॥ क्षण एक सुरवरा । नातुडे नमस्कारा ॥ तो रिसा आणि वानरा । क्षेम दे राम ॥ ५ ॥ राम सांवळा सगुण । राम योगियांचें ध्यान ॥ राम राजीवलोचन । तुका चरण वंदितो ॥ ६ ॥

॥ ७०४८ ॥ सीतावल्लभाच्या गुणा । कोण करील गणना ॥ १ ॥ शीववरद रावण । ऐश्वर्य ज्याचें पूर्ण ॥ २ ॥ रावणासी निवटुनी । सीता आणिली सोडुनी ॥ ३ ॥ विभीषण लंकापती । केला बंधुसमप्रीति ॥ ४ ॥ तुका ह्मणे दयावंत । राम दशरथसुत ॥ ५ ॥

॥ ७०४९ ॥ जैसा राम दयावंत । ऐसा नाहीं त्रैलोक्यांत ॥ १ ॥ अपराध कागऋषी । तेणें छळिलें सीतेसी ॥ २ ॥ दर्भ हिरवा लागे पाठीं । झाला काग तो हिंपुटी ॥ ३ ॥ झाला हरीसी शरण । रामें दिलें वरदान ॥ ४ ॥ तुका ह्मणे माझा राम । पतीताचे हरी श्रम ॥ ५ ॥

॥ ७०५० ॥ श्रमहारक श्रीराम । भक्त काम कल्पद्रुम ॥ १ ॥ ज्याचें नाम तिहीं लोकीं । वंदियेलें तिहीं लोकीं ॥ २ ॥ पूर्ण महिमा नामाचा । अंत पुरे न वेदाचा ॥ ३ ॥ तुका म्हणे नाम थोर । वेदशास्त्रांचें जिव्हार ॥ ४ ॥

॥ ७०५१ ॥ रामचंद्रा दयाळुवा । रावणारी सीताधवा ॥ १ ॥ रामचंद्र भक्तसखा । अनाथांचा पाठीराखा ॥ २ ॥ रामचंद्र पांडुरंग । आदि-अनादि श्रीरंग ॥ ३ ॥ रामचंद्र जीवप्राण । भक्ता प्रेमळाचा जाण ॥ ४ ॥ रामचंद्र आदि अंतीं । तुका म्हणे सर्व भूतीं ॥ ५ ॥

॥ ७०५२ ॥ रामचंद्र आराधन । ज्याचे वंशीं तोचि धन्य ॥ १ ॥ रामचंद्र जया मुखीं । तोचि होय सर्व सुखी ॥ २ ॥ रामचंद्र जनीं वनीं । पाहे तोचि महामुनी ॥ ३ ॥ रामचंद्रीं नाहीं मन । तुका म्हणे तो पाषाण ॥ ४ ॥

॥ ७०५३ ॥ अणुमाजी राम रेणुमाजी राम ॥ तृणकाष्ठीं राम वर्ततसे ॥ १ ॥ ब्रम्हाविष्णुरुद्र राममूर्ती ध्याती ॥ अखंड तपती राम राम ॥ २ ॥ बाहेर भितरीं सर्व निरंतरीं ॥ विश्वीं विश्वाकारीं व्याप्य राम ॥ ३ ॥ रामाविण स्थळ रितें कोठें नाहीं ॥ वर्ततसे ठायीं बाप माझा ॥ ४ ॥ परिसा भागवत कायावाचामनीं ॥ श्रीरामावांचोनी तुका नेणे ॥ ५ ॥

## सदाशिवावर अभंग.

॥ ७०५४ ॥ कांय धर्म नीत । तुम्हां शिकवावें हित ॥ १ ॥ अवघें रचियेलें हेळा । लीळा ब्रह्मांड सकळा ॥ २ ॥ नाम महादेव । येथें निवडला भाव ॥ ३ ॥ तुका म्हणे वेळे । माझें तुम्हां कां न कळे ॥ ४ ॥

॥ ७०५५ ॥ भांडावें तें गोड । पुरे सकळ ही कोड ॥ १ ॥ ऐसा घरींचा मोळा । ठावा निकटां जवळां ॥ २ ॥ हाक देतां दारीं । येती जवळी सामोरीं ॥ ३ ॥ तुका म्हणे शिवें । मागितलें हातीं द्यावें ॥ ४ ॥

॥ ७०५६ ॥ देव देवाचा हा देव । देवातीत महादेव ॥ १ ॥ किरीट कुंडलें रुंडमाळा । अंगीं भस्माची मेखळा ॥ २ ॥ काखे झोळी हातीं पत्र । भिक्षा मागे पार्वतीवर ॥ ३ ॥ राजा श्रियाळ चांगुणा । अतिथी आलासे निर्वाणा ॥ ४ ॥ भक्तां संकटीं निर्वाणी । तुका रुळे त्याचे चरणीं ॥ ५ ॥

॥ ७०५७ ॥ भाळलोचना विशाळा । नंदीवाहना दयाळा ॥ १ ॥ भोळ्या पतीतपावना । दुष्टदैत्यनिर्दळणा ॥ २ ॥ गौरीप्रीय सदाशिवा । विश्वव्यापका माधवा ॥ ३ ॥ भोळा शंभू चक्रवर्ती । ऐसा नाहीं त्रिजगती ॥ ४ ॥ तुका म्हणे पायीं ठेवा । हरी वासना पुरवा ॥ ५ ॥

## दत्तात्रय स्तुति.

॥ ७०५८ ॥ तीन शिरें सहा हात । तया माझें दंडवत ॥ १ ॥ काखीं झोळी पुढें श्वान । नित्य जान्हवीचें स्नान ॥ २ ॥ माथां शोभे जटाभार । अंगीं विभुती सुंदर ॥ ३ ॥ शंख चक्र गदा हातीं । पायीं खडावा गर्जती ॥ ४ ॥ तुका ह्मणे दिगांबर । तया माझा नमस्कार ॥ ५ ॥

## हनुमंत स्तुति.

॥ ७०५९ ॥ शरण शरण जी हनुमंता । तुज आलों रामदूता ॥ १ ॥ काय भक्तीच्या त्या वाटा । मज दावाव्या सुभटा ॥ २ ॥ शूर आणि धीर । स्वामीकार्जीं तूं सादर ॥ ३ ॥ तुका ह्मणे रुद्रा । अंजनीचिया कुमरा ॥ ४ ॥

॥ ७०६० ॥ केली सीताशुद्धि । मूळ रामायणा आधीं ॥ १ ॥ ऐसा प्रतापी गहन । सुरां सकळ मोहन ॥ २ ॥ जाऊनी पाताळा । केली देवीची अवकळा ॥ ३ ॥ राम लक्षुमण । नेले आणिले चोरून ॥ ४ ॥ जोडूनियां कर । उभा सन्मुख समोर ॥ ५ ॥ तुका ह्मणे जपें । वायुसुता जाती पापें ॥ ६ ॥

॥ ७०६१ ॥ काम घातला बांधोडी । काळ केला देशधडी ॥ १ ॥ तया माझें दंडवत । कपिकुळीं हनुमंत ॥ २ ॥ शरीर वज्राऐसें । कवळी ब्रम्हांड जो पुच्छें ॥ ३ ॥ रामाच्या सेवका । शरण आलों म्हणे तुका ॥ ४ ॥

॥ ७०६२ ॥ हनुमंत महाबळी । रावणाची दाढी जाळी ॥ १ ॥ तया माझा नमस्कार । वारंवार निरंतर ॥ २ ॥ करोनी उड्डाण । केलें लंकेचें शोधन ॥ ३ ॥ जाळियेली लंका । धन्य धन्य म्हणे तुका ॥ ४ ॥

॥ ७०६३ ॥ आणुनियां गिरीद्रोण । वांचविला लक्षुमण ॥ १ ॥ नमूं तुज बलभीमा । कळे प्रतापाची सीमा ॥ २ ॥ केलें सिंधुचें लंघन । केलें सीतेचें शोधन ॥ ३ ॥ एकनिष्ठ निरंतर । रामकार्यासी तत्पर ॥ ४ ॥ तुका म्हणे नाम । वसे हृदयीं आराम ॥ ५ ॥

## कार्तिकीचा सोहळा.

॥ ७०६४ ॥ कार्तिकीचा सोहळा । चला जाऊं पाहूं डोळां ॥ आलें वैकुंठ जवळां । पंढरिये सन्निध ॥ १ ॥ पीक पिकलें घुमरी । प्रेम न समाये अंबरीं ॥ अवघी मातली पंढरी । घरोघरीं सुकाळ ॥ २ ॥ चालती स्थिर स्थिर । गरुड टकयांचे भार ॥ गर्जती गंभीर । टाळ श्रुति मृदंग ॥ ३ ॥ मिळालियां भद्रजाती । कैशा आनंदें डुल्लती ॥ शूर उठावती । एका एक आगळे ॥ ४ ॥ नामामृत कल्लोळ । वृंदें कोंदलीं सकळ ॥ आलें वैष्णवदळ । कळिकाळ कांपती ॥ ५ ॥ आस करिती ब्रम्हादिक । देखुनि वाळवंटींचें सुख ॥ धन्य धन्य मृत्युलोक । म्हणती भाग्याचे कैसे ॥ ६ ॥ मरण मुक्ति वाराणसी । पितृऋण गया कासी ॥ उधार नाहीं पंढरीसी । पायापाशीं विठोबाच्या ॥ ७ ॥ तुका म्हणे आतां । काय करणें आम्हां चिंता ॥ सकळ सिद्धींचा दाता । तो सर्वथा नुपेक्षी ॥ ८ ॥

## पंढरपूर.

॥ ७०६५ ॥ जया दोषां परिहार । नाहीं नाहीं धुंडतां शास्त्र ॥ ते हरती आपार । पंढरपूर देखिलियां ॥ १ ॥ धन्य धन्य भीमातीर । चंद्रभागा स-

रोवर ॥ पद्मतीर्थीं विठ्ठल वीर । क्रीडास्थळ वेणुनादीं ॥ २ ॥ सकळ तीर्थांचें माहेर । भूवैकुंठ निर्विकार ॥ होतो नामाचा गजर । असुरकाळ कांपती ॥ ३ ॥ नाहीं उपमा द्यावया । सम तुल्य आणिका ठाया ॥ धन्य भाग्य जयां । जे पंढरपूर देखती ॥ ४ ॥ उपजोनी संसारीं । एक वेळ पाहें पंढरी ॥ महा दोषां कैंची उरी । देवभक्त देखिलिया ॥ ५ ॥ ऐसी विष्णूची नगरी । चतुर्भुज नर नारी ॥ सुदर्शन घरटी करी । रीग न पुरे कळिकाळा ॥ ६ ॥ तें सुख वर्णावया गति । एवढी कैंची मज मति ॥ जे पंढरपुरा जाती । ते पावती वैकुंठ ॥ ७ ॥ तुका ह्मणे या शब्दाचा । जया विश्वास नाहीं साचा ॥ अधम जन्मांतरींचा । तया पंढरी नावडे ॥ ८ ॥

॥ ७०६६ ॥ दामाजीपंताची रसद गुदरली । लज्जा सांभाळिली देवरायें ॥ १ ॥ तयाचें चरित्र परिसा हो सादरें । करितों नमस्कार संतजनां ॥ २ ॥ पांडुरंगीं ज्याची निष्ठा परिपूर्ण । सर्वांभुतीं जाणें एक निष्ठा ॥ ३ ॥ मंगळवेढा असे वस्ति कुंडुबेंसी । व्यापारी सर्वांसी मान्य सदा ॥ ४ ॥ कर्म काय करी ठाणाचा हवाला । तों कांहीं पडला कठिण काळ ॥ ५ ॥ धान्याचीं भांडारें होतीं तीं फोडिलीं । पंढरी रक्षिली दुष्काळांत ॥ ६ ॥ दुबळीं अनाथ तीं ही वांचविलीं । राष्ट्रांतते झाली कीर्ति मोठी ॥ ७ ॥ मुजुम करीत होता कानडा ब्राह्मण । फिर्याद लिहून पाठविली ॥ ८ ॥ अविंदाचें राज्य बेदरीं असतां । कागद पाहतां तलब केली ॥ ९ ॥ दामाजीपंतासी धरोनी चालविलें । इकडे या विठ्ठलें माव केली ॥ १० ॥ माझिया भक्तांचें जे उणें पहाती । तया अधःपातीं वस्ती होय ॥ ११ ॥ भक्तांचें सांकडें सोसी अहर्निशी । अखंड त्यांपासी तिष्ठे हरी ॥ १२ ॥ मंगळवेढ्यांतुनी पंढरीसी आला । जिवें ओंवाळिला दामाजीनें ॥ १३ ॥ सवें दूत घेऊनी आला पंढरीसी । नमस्कार देवासी केला त्यानें ॥ १४ ॥ हेचि भेटी देवा लोभ असों द्यावा । पुनः मी केशवा नये येथें ॥ १५ ॥ अहो रुक्मिणी जिवींचें हें गुज । पूर्ण भक्तराज दामाजी हा ॥ १६ ॥ फेडिला सोनसळा कास जें घातली । वैजयंती काढिली कुंडलें तीं ॥ १७ ॥ रुक्मिणी पुसते एक विज्ञापना । ऐका नारायणा करुणा माझी ॥ १८ ॥ निढाळले नयन दिसताती आजी । अवस्था हे कांजी विपरीत ॥ १९ ॥ बेदरासी रायें त्याला चालविलें । मज सांभाळिलें पाहिजे त्या ॥ २० ॥ विकते धारणे सवाईचें मोल । धान्याचें सकळ द्रव्य केलें ॥ २१ ॥ दामाजीपंताच्या नांवें

अर्जदास्त । लिहून खलेती मुद्रा केली ॥ २२ ॥ विठो पाडेवार भक्तां साह्य झाला । बेदरासी गेला रायापासीं ॥ २३ ॥ जोहार मायबाप पुसती कोठील । तंव तो म्हणे स्थळ मंगळवेढें ॥ २४ ॥ दामाजीपंतांनीं रसद पाठविली । खलेती ओतिली अर्जदास्त ॥ २५ ॥ देखोनियां राजा संतोष पावला । म्हणे व्यर्थ साला तलब केली ॥ २६ ॥ काय तुझें नांव पुसती यंत्रधारी । तो म्हणे बेगारी विठा कीं जी ॥ २७ ॥ पावलयाचा जाब द्यावा मायबाप करोनि घेनों माप म्हणती ते ॥ २८ ॥ पावलयाचा जाब दिधला लिहून । तसरीफ देऊन पाठविला ॥ २९ ॥ छत्री घोडा शिबिका आभरणांसहित । दिला सवें दूत पाठवूनी ॥ ३० ॥ वाटे चुकामुक झाली याची त्यांची । ते आले तैसेचि मंगळवेढा ॥ ३१ ॥ दामाजीपंतासी बेदरासी नेलें । राजा म्हणे झालें कवतुक ॥ ३२ ॥ काल गेला विठा बेगारी देऊन । तसरीफ देऊन जाब दिला ॥ ३३ ॥ काय तुमचें काज सांगा जी सत्वर । बोलाजी निर्धार वचनाचा ॥ ३४ ॥ कैंचा विठा कोण पाठविला कधीं । काढोनियां आधीं जाब दिला ॥ ३५ ॥ पाहातांचि जाब हृदय फुटलें । नयन निडारले राजा देखे ॥ ३६ ॥ सांवळें सकुमार रूप मनोहर । माथां तेणें भार वाहियेला ॥ ३७ ॥ दामाजीपंतासी रायें सन्मानिलें । तो म्हणे आपलें कर्म नव्हे ॥ ३८ ॥ आतां तुमची सेवा पुरे जी स्वामिया । शिणविलें सखया विठोबासी ॥ ३९ ॥ निरोप घेऊनी आला स्वस्थळासी । उदास सर्वांसीं होता झाला ॥ ४० ॥ दामाजीपंतांनीं सेविली पंढरी । ऐसा त्याचा हरि निकटवृत्ति ॥ ४१ ॥ तुका म्हणे विठो अनाथ कैवारी । नुपेक्षी हा हरि दासालागीं ॥ ४२ ॥

---

## मनास बोध.

### श्लोकरूपी अभंग.

॥ ७०६७ ॥ तुजवांचुनी मागणें काय कोणा । महीमंडळीं विश्वव्यापकजना ॥ जीवभावना पूरवूं कोण जाणे । तुजवांचुनी होत कां रावराणे ॥ १ ॥ नसे मोक्षदाता तिहींमाजि लोकां । भवनारकु तूजवांचूनि एका ॥ मनीं मानसीं चिंतितां रूपनाम । पळे पाप ताप भयें नासे काम ॥ २ ॥ हरी नाम हें साच तूझें पुराणीं । हरी हा तिचें काळगर्भादियोनी ॥ करूं मुखवाणी

कैसी देशधडी । तुजवांचुनी वाणितां व्यर्थ गोडी ॥ ३ ॥ भवभंजना व्यापका लोक तिन्ही । तुज वाणितां श्रमला शेषफणी ॥ असो भावें जीव तुझ्या सर्व पायीं । तुजें मागणें आणिक व्यर्थ कायी ॥ ४ ॥ दिनानाथ हे साक्ष तूझी जनासी । दिनें तारिलीं पातकी थोर दोषी ॥ तुका राहिला पायीं तो राख देवा । असें मागतसे तुझी चरणसेवा ॥ ५ ॥

॥ ७०६८ ॥ उभीं भींवरेच्या तिरीं राहिलाहे । असे सन्मुख दक्षिणे मूख वाहे ॥ महापातकांसी पळ कांप थोर । कैसे गर्जती घोष हे नाम वीर ॥ १ ॥ गुणगंभीर हा धीर हास्यमुख । वदे वदनीं अमृत सर्वसुख ॥ लागलें मुनिवरां हें गोड चित्तीं । देहभावना तुटलियासी खंती ॥ २ ॥ ठसा घातला ये भूमिमाजी थोर । इच्छादाना हा द्यावयासी उदार ॥ जया वोळगती सिद्धि सर्वठायीं । तुझें नाम हें चांगलें गे विठाई ॥ ३ ॥ असे उघडा हा विटेवरि उभा । कटसूत्र हें धरुनी भक्तिलोभा ॥ पुढें वाट दावी भवसागराची । विठो माउली हे सिद्धसाधकांची ॥ ४ ॥ करावे गुह्य धरा पथ आधीं । जया पार नाहीं सुखा तेंच साधीं ॥ ह्मणे तुका पंढरीस सर्व आलें । असे विश्व हें जीवनें ह्याचि ज्यालें ॥ ५ ॥

॥ ७०६९ ॥ धना गुंतलें चित्त माझें मुरारी । मन घेउनी हिंडवी दारोदारीं ॥ मरे हिंडतां न पुरे यासि कांहीं । मही ठेंगणी परि तें तृप्त नाहीं ॥ १ ॥ न दिसे शुद्ध पाहतां निजमति । पुढें पडिलों इंद्रिया थोर घातीं ॥ जिवा नास सा संगती दंड बेडी । हरी शीघ्र या दुष्ट संगासि तोडीं ॥ २ ॥ असीं आणिकें काय सांगों अनंता । मोहो पापिणी दुष्टमाया ममता ॥ क्रोध काम यातना थोर करी । तुजवांचुनी सोडवी कोण हरी ॥ ३ ॥ निज देखतां निज हे दूरि जाये । निद्रा आळस दंभ या भीत आहें ॥ तयां वस्ति देहीं नको देऊं देवा । तुजवांचुनी आणिक नास्ति हेवा ॥ ४ ॥ करीं घात पात शंका लाज थोरी । असे सख भाव बहू भक्ति दूरी ॥ नको मोकलूं दीनबंधु अनाथा । तुका वीनवी ठेवुनी पायि माथा ॥ ५ ॥

॥ ७०७० ॥ पैल सांवळें तेज पुंजाळ कैसें । सिरीं तुर्बिलीं साजिरीं मोरपीसें ॥ हरे त्यासि रे देखतां ताप माया । भजा रे भजा यादवा योगिराया ॥ १ ॥ जया कामिनी लुब्धल्या सहस्रसोळा । सुकुमार ह्या गोपिका दिव्य बाळा ॥ शोभे मध्यभागीं कळा चंद्रकोटी । रूपा मीनली साजिरी माळ कंठीं ॥ २ ॥ असे यादवां श्रेष्ठ हा चक्रपाणी । जया वंदिती कोटि-

तेहतीस तीन्ही ॥ महाकाळ हे कांपती दैत्य ज्यासी । पाहा सांवळें रूप हें पापनासी ॥ ३ ॥ कसीं पाउलें साजिरीं कुंकुमाचीं । कसी वीट हे लाधली दैवाची ॥ जया चिंतितां अग्नि हा शांति नीवे । धरा मानसीं आपला देहभाव ॥ ४ ॥ सुनी देखतां सूख हें चित्त ध्याय । देह मांडला भाव हा बापमाय ॥ तुक्या लागलें मानसीं देवपीसें । चित्त चोरटें सांवळें रूप कैसें ॥ ५ ॥

॥ ७०७१ ॥ असे नांदतु हा हरी सर्वजीवीं । असे व्यापुनी अग्नि हा काष्ठ तेवीं ॥ घटीं बिंबलें बिंब हें ठायिंठायीं । तया संगती नासु हा सासिनाहीं ॥ १ ॥ तन वाटितां क्षीर हें होत नाहीं । पशू भक्षितां पालटे तें चि देहीं ॥ तया वर्म तो जाणता एक आहे । असे व्यापक व्यापुनी अंतर्बाहे ॥ २ ॥ फळ कर्दळीं सेवटीं येत आहे । असे शोधितां पोकळीमाजि काये ॥ धीर नाहीं तें वाउगें धींग झालें । फळ पुष्प ना यत्न ते व्यर्थ गेले ॥ ३ ॥ असें नाम हें दर्पणें सिद्ध केलें । असें बिंब तें या मळा आड ठेलें । कसें शुद्ध नाहीं दिसे माजि रूप । नका वाढवूं सीण हा पुण्यपाप ॥ ४ ॥ करा वर्म ठावें नका सोंग वांयां । तुका वीनवीतो पडों काय पायां । तुज पुत्र दारा धन वासना हे । मग ऊरलें शेवटीं काय पाहे ॥ ५ ॥

॥ ७०७२ ॥ मना सांडिं हे वासना दुष्ट खोडी । मनी मानसीं एक हे व्यर्थ गोडी ॥ असे हीत माझें तुज कांहीं एक । धरीं विठ्ठलीं प्रेम हें पायिं सूख ॥ १ ॥ ऐसा सर्वभावें तुज शरण आलों । देहदुःख हें भोगितां फार भ्यालों ॥ भवतारितें दूसरें नाहिं कोणी । गुरु होत कां देव तेहेतीस तीन्ही ॥ २ ॥ जना वासना हे धना थोरि आहे । तुज लागली संगती तेचि सोये । करीं सर्व संगी परि सागु ठायीं । तुका वीनवीतो मस्तक ठेवूनि पायीं ॥ ३ ॥

---

## जोहार अभंग.

---

॥ ७०७३ ॥ मायबाप जोहार जी जोहार । सारा साधावया आलों वेसकर ॥ १ ॥ मागील पुढील करा झाडा । नाहीं तरी खोडा घालिती जी ॥ २ ॥ फांकूं नका रुजू झालियावांचून । सांगा जी कोण धरिती धण्या ॥ ३ ॥ आजी मायबाप करा तडामोडी । उद्यां कोणी घडी राहेना हो ॥ ४ ॥ तुका ह्मणे कांहीं न चले ते बोली । अखरें सालीं झाडा घेती ॥ ५ ॥

॥ ७०७४ ॥ येऊं द्या जी कांहीं वेसकरास। आंतून बाहेर वोजेचा वास ॥ १ ॥ जों यावें तों हातचि रिता नाहीं। कधीं तरी कांहीं द्यावें घ्यावें ॥ २ ॥ तुका म्हणे उद्यां लावीन मनेरा। जे हे दारोदारांभोंवतीं फिरा ॥ ३ ॥

॥ ७०७५ ॥ देती घेती परज गेली। घर खालीं करूनियां ॥ १ ॥ धांवणियाचे न पडे हातीं। खादली राती काळोखी ॥ २ ॥ अवघियांचें अवघें नेलें। कांहीं ठेविलें नाहीं मागें ॥ ३ ॥ सोंग संपादुनि दाविला भाव। गेला आधीं माव वरी होती ॥ ४ ॥ घराकडे पाहूं नयेसेंचि झालें। अमानत केलें दिवाणांत ॥ ५ ॥ आतां तुका कोणा न लगेचि हातीं। झाली ते निश्चिती बोलों नये ॥ ६ ॥

---

## ब्रह्मचर्याश्रम.

॥ ७०७६ ॥ प्रथम जन्मला शुद्ध वर्णाश्रम। व्रतबंधक्रम ब्रह्मचारी ॥ १ ॥ ब्रह्मचारी याचा मुख्य ऐसा धर्म। वेद उपक्रम घोकी सदा ॥ २ ॥ अक्षर अक्षरीं करावा सांटोवा। तेव्हां पडे ठावा वेदमार्ग ॥ ३ ॥ तुका म्हणे येथें चुकलिया वर्म। तया भवभ्रम पाठीं लागे ॥ ४ ॥

---

## गृहस्थाश्रम.

॥ ७०७७ ॥ गृहस्थआश्रम साधीला निर्मळ। गृहिणी सुशील पाहिजे सा ॥ १ ॥ या नांव जोडलें सायासानें धन । आचार निपुण वेदमार्ग ॥ २ ॥ यजन याजन तपव्रत दान। वेद अध्ययन गुरुयुक्त ॥ ३ ॥ प्रतिग्रह घ्यावा निपुण षट्कर्मीं। चित्त ठेवीं नामीं अहर्निशी ॥ ४ ॥ तुका म्हणे विधीनिषेधपाळण। यया नांव जाण गृहस्थाश्रम ॥ ५ ॥

॥ ७०७८ ॥ आपुली शक्ति जैसी तैसा किजे धर्म। परमार्थाचें वर्म हेंचि येथें ॥ १ ॥ मिळाल्यासारिखा विनियोग किजे। ज्याचें त्यासी दिजे विभागोनी ॥ २ ॥ गुरुगोत्र अग्नि ब्राह्मणाचें कळ । पितराचें निर्मळ पितरां अर्ची ॥ ३ ॥ उर्वरित शेष मागें राहिलें जें । कुटुंबासी किजे भोजनासी ॥ ४ ॥ तुका म्हणे तेव्हां धन्य गृहस्थाश्रम। नाहीं तरी श्रम प्रपंचाचा ॥ ५ ॥

## सन्यास.

॥ ७०७९ ॥ या नांव सन्यास नासिला संकल्प । तोडिला विकल्प जाणीवेचा ॥ १ ॥ आशापाश चित्ता आवरावा क्रोध । वृत्तीस अक्रोध निरंतर ॥ २ ॥ वळावीं इंद्रियें खुडुनियां ठायीं । कदापी ही नाहीं बंधन त्या ॥ ३ ॥ केलें विसर्जन मागील कर्माचें । अखंड चित्ताचें समाधान ॥ ४ ॥ तुका ह्मणे कार्याकारण ते नेम । सन्यासीया धर्मा आचरावें ॥ ५ ॥

॥ ७०८० ॥ वेदवाणी बोले आचाराविहित । बोलियली नीत तेणें पाडें ॥ १ ॥ सांडुनियां जरी आडमार्गें जातां । वळेंची अहंता पाठीं लागे ॥ २ ॥ आपपर नाहीं थोरसान दृष्टी । समत्व हें सृष्टीं दिसों लागे ॥ ३ ॥ सहज प्रारब्धें जेंजें घडे कर्म । तोचि जाणा नेम नित्य होय ॥ ४ ॥ शुभाशुभ नेम नित्य परिचारी । योग मार्ग तरी ऐसा नव्हे ॥ ५ ॥ न सुटेची मूळ नाहीं यातीकूळ । विश्व हें सकळ ब्रह्म देखे ॥ ६ ॥ बोलिला जो धर्म त्यागितां आचार । तो जाण साचार पातकी हा ॥ ७ ॥ तुका म्हणे बोले श्रुतीवाक्य ऐसें । मोकळा सारिसें शिष्य पावे ॥ ८ ॥

## एकनाथस्तुति.

॥ ७०८१ ॥ शरण शरण एकनाथा । चरणीं माथा ठेविला ॥ १ ॥ नका पाहूं गुणदोष । झालों दास पायांचा ॥ २ ॥ आतां मज उपेक्षितां । नाहीं सत्ता आपुली ॥ ३ ॥ तुका म्हणे भागवत । केलें श्रुत सर्वांसी ॥ ४ ॥

## धुर्वक अभंग.

॥ ७०८२ ॥ करिसी कीं न करिसी माझा अंगीकार । हा मज विचार पडिला देवा ॥ १ ॥ देसी कीं न देसी पायांचें दर्शन । ह्मणऊनि मन स्थिर नाहीं ॥ २ ॥ बोलसी कीं न बोलसी मजसवें देवा । ह्मणोनियां जीवा भय वाटे ॥ ३ ॥ होईल कीं न होय तुज माझा आठव । पडिला संदेह हाचि मज ॥ ४ ॥ तुका म्हणे मी तों कमाईचें हीण । म्हणऊनी सीण करीं देवा ॥ ५ ॥

॥ ७०८३ ॥ ऐसा माझा कोण आहे भीडभार । नांवाचा मी फार वांयां गेलों ॥ १ ॥ काय सेवा रुजू आहे सत्ताबळ । तें मज राऊळ कृपा करी ॥ २ ॥ काय याति शुद्ध आहे कुळ कर्म । तेणें पडे वर्म तुझे ठायीं ॥ ३ ॥ कोण तपोनिधि दानधर्मशीळ । अंगीं एक बळ आहे सत्ता ॥ ४ ॥ तुका म्हणे वांयां झालों भूमीभार । होईल विचार काय नेणों ॥ ५ ॥

॥ ७०८४ ॥ साच मज काय कळों नये देवा । काय तुझी सेवा काय नव्हे ॥ १ ॥ करावें तें बरें जेणें समाधान । सेवावें हें वन न बोलावें ॥ २ ॥ शुद्ध माझा भाव होईल तुझे पायीं । तरीच हें देईं निवडूनी ॥ ३ ॥ उचित अनुचित कळों आली गोष्टी । तुझे कृपादृष्टी पांडुरंगा ॥ ४ ॥ तुका म्हणे मज पायांसवें चाड । सांगसी तें गोड आहे मज ॥ ५ ॥

॥ ७०८५ ॥ वांयांविण वाढविला हा लौकिक । आणिला लटिक वाद दोघां ॥ १ ॥ नाहीं ऐसा झाला देव माझ्या मतें । भुकेलें जिवितें काय जाणे ॥ २ ॥ शब्दज्ञानें गौरविली हे वैखरी । साच ते अंतरीं विवेचिना ॥ ३ ॥ झालों परदेशी गेले दोन्ही ठाय । संसार ना पाय तुझे देवा ॥ ४ ॥ तुका म्हणे मागें कळों येतें ऐसें । न घेतां हें पिसें लावूनियां ॥ ५ ॥

॥ ७०८६ ॥ न कळे तत्वज्ञान मूढ माझी मति । परि ध्यातों चित्तीं चरणकमळ ॥ १ ॥ आगमाचे भेद मी तों काय जाणें । काळ तो चिंतनें सारीतसे ॥ २ ॥ कांहीं नेणें परि म्हणवितों दास । होईल साचा त्यास अभिमान ॥ ३ ॥ संसाराची सोय सांडिला मारग । दुराविलें जग एका घायें ॥ ४ ॥ मागिल्या लागाचें केलेंसे खंडन । एकाएकीं मन राखियेलें ॥ ५ ॥ तुका म्हणे अगा रखुमादेवीवरा । भक्तकरुणाकरा सांभाळावें ॥ ६ ॥

॥ ७०८७ ॥ इतुलें करीं देवा ऐकें हें वचन । समूळ अभिमान जाळीं माझा ॥ १ ॥ इतुलें करी देवा ऐकें हे गोष्टी । सर्व समदृष्टी तुज देखें ॥ २ ॥ इतुलें करीं देवा विनवितों तुज । संतचरणरज वंदीं माथां ॥ ३ ॥ इतुलें करीं देवा ऐकें हे मात । हृदयीं पंढरीनाथ दिवसरात्रीं ॥ ४ ॥ भलतिया भावें तारीं पंढरीनाथा । तुका म्हणे आतां शरण आलों ॥ ५ ॥

॥ ७०८८ ॥ तुझा दास ऐसा म्हणती लोकपाळ । म्हणऊनी सांभाळ करीं माझा ॥ १ ॥ अनाथाचा नाथ पतितपावन । हें आतां जतन करीं नाम ॥ २ ॥ माझे गुण दोष पाहातां न लगे अंत । ऐसें माझें चित्त मज ग्वाही ॥ ३ ॥ नेणें तुझी कैसी करावी हे सेवा । जाणसी तूं देवा अंतरींचें ॥ ४ ॥ तुका म्हणे तूं या कृपेचा सिंधु । तोडीं भवबंधु माझा देवा ॥ ५ ॥

॥ ७०८९ ॥ जाणावें तें काय नेणावें तें काय । ध्यावे तुझे पाय हेंचि सार ॥ १ ॥ करावें तें काय न करावें तें काय । ध्यावे तुझे पाय हेंचि सार ॥ २ ॥ बोलावें तें काय न बोलावें तें काय । ध्यावे तुझे पाय हेंचि सार ॥ ३ ॥ जावें तें कोठें न जावें तें आतां । बरवें आठवितां नाम तुझें ॥ ४ ॥ तुका म्हणे तूं करिसी तें सोपें । पुण्यें होती पापें आमुच्या मतें ॥ ५ ॥

॥ ७०९० ॥ नको ब्रह्मज्ञान आत्मस्थितिभाव । मी भक्त तूं देव ऐसें करीं ॥ १ ॥ दावीं रूप मज गोपिकारमणा । ठेवीन चरणांवरी माथा ॥ २ ॥ पाहोनी श्रीमुख देईन आलिंगन । जीवें निंबलोण उतरीन ॥ ३ ॥ पुसतां सांगेन हितगुज मात । बैसोनी एकांत सुखगोष्टी ॥ ४ ॥ तुका ह्मणे यासी न लावीं उशीर । माझें अभ्यंतर जाणोनियां ॥ ५ ॥

॥ ७०९१ ॥ मागें शरणागत तारिले बहुत । ह्मणती दीनानाथ तुज देवा ॥ १ ॥ पाहिले अपराध नाहीं याती कुळ । तारिला अजामेळ गणिका भिल्ली ॥ २ ॥ अढळपदीं बाळ बैसविला ध्रुरु । क्षीराचा सागरु उपमन्या ॥ ३ ॥ गजेंद्रपशु नाडिला जळचरें । भवसिंधुपार उतरिला ॥ ४ ॥ प्रल्हाद अग्नींत राखिला जळांत । विषाचें अमृत तुझ्या नामें ॥ ५ ॥ पांडवां संकट पडतां जडभारी । त्यांचा तूं कैवारी नारायण ॥ ६ ॥ तुका ह्मणे तूं या अनाथाचा नाथ । ऐकोनियां मात शरण आलों ॥ ७ ॥

॥ ७०९२ ॥ तुझा शरणागत झालों मी अंकित । करीं माझें हित पांडुरंगा ॥ १ ॥ पतितपावन तुझी ब्रीदावळी । ते आतां सांभाळीं मायबापा ॥ २ ॥ अनाथाचा नाथ बोलतील संत । ऐकोनियां मात विश्वासलों ॥ ३ ॥ न करावी निरास न धरावें उदास । देईं याचकास कृपादान ॥ ४ ॥ तुका ह्मणे मी तों पातकांची रासी । देईं पायापासीं ठाव देवा ॥ ५ ॥

॥ ७०९३ ॥ सर्वस्वाचा त्याग तो सदा सोंवळा । न लिंपे विटाळा अग्नि जैसा ॥ १ ॥ सत्यवादी करी संसार सकळ । अलिप्त कमळ जळीं जैसें ॥ २ ॥ वडे ज्या उपकार भूतांचीं ते दया । आत्मस्थिति तया अंगीं वसे ॥ ३ ॥ न बोले गुणदोष नाइके जो कानीं । वर्तोनी तो जनीं जनार्दन ॥ ४ ॥ तुका ह्मणे वर्म जाणितल्याविण । पावे करितां सीण सांडीमांडी ॥ ५ ॥

॥ ७०९४ ॥ कुळधर्म ज्ञान कुळधर्म साधन । कुळधर्में निधान हातीं चढे ॥ १ ॥ कुळधर्में भक्ति कुळधर्में गति । कुळधर्म विश्रांति पाववील ॥ २ ॥ कुळधर्में